International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 Nov-Dec 2023

# संत तुकारामांच्या अभंगातील विविधता

**डॉ.वंदना सांडूराव पाटील**
कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली, ता.कन्नड जी.छ.संभाजीनगर
**Corresponding Author – डॉ.वंदना सांडूराव पाटील**
**DOI- 10.5281/zenodo.14410963**

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील यादव काळ म्हणजे तेरावे शतक हा अत्यंत महत्त्वाचा काळ आहे. या कालखंडात नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय व वारकरी संप्रदाय इत्यादी पंथ अस्तित्वात आले. अध्यात्मिक व सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे बिजारोपण वारकरी संप्रदायात ज्ञानदेव व नामदेवांनी केले.पुढे याचा विस्तार होऊन वारकरी हा महाराष्ट्रातला सर्वात मोठा संप्रदाय झाला. अनेक संतांनी भक्तीच्या रूपाने अभंग रचना केली आहे. संत ज्ञानेश्वर,संत नामदेव, संत एकनाथ,संत जनाबाई, संत गोरा कुंभार,संत तुकाराम इत्यादीचे यात महत्वपूर्ण योगदान आहे. संत ज्ञानदेवांनी उभारलेल्या भागवत धर्माच्या मंदिरावर कळस चढवण्याची कामगिरी तुकाराम महाराजांनी पार पाडली. ज्ञानेश्वरांनी स्त्री शूद्रांच्या उन्नतीचे जे ध्येय डोळ्यापुढे ठेवले होते ते तुकारामांच्या रूपाने प्रत्यक्षात उतरले. संत तुकाराम भागवत म्हणजेच वारकरी संप्रदायाचे होते. या संतांनी आपल्या भक्ती मार्गातून भागवत संप्रदायाचा विस्तार केला.

---

संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील एक थोर संत होते. इसवी सन १६३८ ते १६५० हा त्यांचा कालखंड मानला जातो. धार्मिक वातावरणात वाढल्यामुळे त्यांना अध्यात्मिक वारसा लाभला होता. तुकारामांचे लौकिक जीवन आणि अध्यात्मिक भावजीवन त्यांच्या अभंगातून उत्कृष्टपणे आविष्कृत झाले आहे. संत तुकारामांचे आज पाच हजार अभंग उपलब्ध आहेत. परंतु या अभंग रचनेचा ठराविक असा क्रम उपलब्ध नाही कारण तुकारामांची ही अभंगवाणी उत्स्फूर्त, उत्कट व प्रासंगिक आहे.

परमार्थिक जीवनात तुकाराम उद्विग्न झाले होते आई वडील सोडून गेले. संसाराची वाताहत झाली. दुकानदारी बंद पडली. संसारातील आपत्ती, दुःख, चिंता यामुळे ते उदास झाले होते. संत नामदेवांनी त्यांना स्वप्नात येऊन अभंग करण्याची प्रेरणा दिली त्यातून स्फूर्ती घेऊन तुकाराम अभंग रचू लागले. कर्मकांडा पेक्षा भक्ती भावाने नीतीने सदाचाराचे महत्व ते आपल्या अभंगातून सांगू लागले परंतु हे सगळे करणे प्रतिष्ठितांची मक्तेदारी असल्यामुळे त्याचा रोश तुकारामांना सहन करावा लागला. काहींनी तर त्यांचे अभंग आपल्या नावावर विकले व रामेश्वर भटा सारखे विद्वान धर्माधिकारी याने त्यांच्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडवल्या. काव्य करण्याचा, भक्ती करण्याचा अधिकार भटांकडे कडे होता. परंतु अभंग करण्याचे, बहुजन समाजाला भक्तिमार्ग दाखवण्याचे काम एका शूद्र वैश्याने केल्यामुळे त्यांना भटांच्या या रोशाला बळी पडावे लागले. अठरापगड जातीच्या लोकांना त्यांचे अभंग मुखोद्गत होते. त्यामुळे ते बुडू शकले नाही व आजही ते सर्वसामान्य लोकांना पथदर्शक आहे.

संत तुकाराम खरंच जगद्गुरु होते. संयम, सहनशक्ती, क्षमावृत्ती, परोपकार या चार वृत्तींचा संगम म्हणजे संत तुकाराम होत. जशी त्यांनी श्रीमंती अनुभवली तसेच दारिद्र्यही तितक्याच शांतपणे स्वीकारले.अनेकांनी त्यांना फसवले, लुबाडले पण त्यांनी कुणावरही राग धरला नाही. अनेकांनी त्यांना त्रास दिला परंतु त्यांनी सगळयांना मोठ्या मनाने माफ केले. तुकाराम महाराज अत्यंत प्रामाणिक होते आपले वागणे,आपले कर्तव्य त्यांनी अत्यंत पवित्र ठेवले. तुकारामांची विठ्ठल भक्ती फक्त ईश्वर प्राप्तीसाठीच होती. त्यांना धनसंपदा,मुक्ती नको होती तर त्यांना सत्संग हवा होता. ईश्वराकडे ते एकच मागणे मागत होते.

हेचि दान देगा देवा | तुझा विसर न व्हावा || (तु.गा.)

त्यांच्या जीवनात त्यांनी कितीतरी आघात झेलले. कितीतरी वेदना त्यांना सोसाव्या लागल्या. पण विठ्ठलाच्या साक्षीने आपली सत्यनिष्ठा त्यांनी जपली. त्याचे थोडे सुद्धा उल्लंघन त्यांनी केले नाही.

तुकारामांच्या अभंगात नामस्मरण, हरिकीर्तन, संत संगती, साधे राहणे, सत्य आचरण करणे यावर भर होता. खोटेपणा, निंदा ,अहंकार, अनिती याचा त्यांनी कधीच स्वीकार केला नाही दांभिक लोकांवर त्यांनी आपल्या अभंगातून कोरडे ओढले आहेत. कीर्तनकार, पुराणिक, विद्वान कवी, संत यांच्यातही जो खोटेपणा आढळला तो त्यांनी आपल्या अभंगातून चव्हाट्यावर आणला. तुकारामांच्या अभंगात तत्कालीन समाजस्थितीचे चित्र स्पष्टपणे उमटलेले दिसून येते. हा समाज सुधारावा म्हणून त्यांची तळमळ होती त्यामुळेच ते एक समाजसुधारकही आहेत.

**लोकोद्धाराची प्रेरणा :**

धर्म रक्षावयासाठी | करणे अटी आम्हासी |
वाचा बोलो वेदनीती | करू संती केले ते ||
सांगतो ते धर्मनितीचे संकेत | सावधान हीत व्हावे तरी || (तु.गा.)

तुकारामांच्या मनात लोकांचा उद्धार व्हावा हीच इच्छा होती. धर्मरक्षण,पाखंड खंडण,नीतीची चाड याचा पुरस्कार तुकाराम करताना दिसतात.तसेच तुकारामांनी नीती मूल्यांची जोपासना केलेली दिसून येते.

**वैश्य व शूद्रांचे प्रतिनिधी** :

तुकाराम जातीने शूद्र व व्यवसायाने वैश्य होते. त्यांनी आपल्या अभंगात त्याचा उल्लेख केला आहे.

१. याति शूद्र वैश्य केला व्यवसाय || (तु.गा.)
२. शूद्रवंशी जन्मलो | म्हनोनि दंभे मोकलिलो || (तु.गा.)
३.करा कुणबी केलो || नाही तरी दंभेचि असतो मेलो || (तु.गा.)
४.जातीचे वाणी मी पोटीचे कुडे | नका मजपुढे ठकाठकी || (तु.गा.)

तुकारामांच्या या अभंगातून बहुजन समाजाच्या भावना मुखर झालेल्या दिसतात.

**वेद विषयक न्यूनगंड :**

तुकाराम हे शुद्र वर्गाचे प्रतिनिधी होते. याचे कितीतरी उदाहरण त्यांच्या अभंगात सापडतात. वैदिक परंपरेचा वारसा हा मुख्यतः ब्राह्मण क्षत्रियांचा आहे.यात शुद्रातीशुद्रांना मानाचे स्थान नाही. वेदाध्ययनाचा मार्गही त्यांना बंद होता. त्यामुळे भक्तीचा मार्ग त्यांना स्वीकारणे अपरिहार्य होते.

वेद विद्या आपणास अंगी करता येत नाही. याचा न्यूनगंड त्यांच्या अभंगात आलेला आहे.

तारावयाआधी शोधा वेदवाणी || (तु.गा.)
वेदशास्त्र नाही पुराण प्रमाण | तयाचे वदन नाव लोका || (तु.गा.)
वेदांचे गव्हर नकळे पाठकां अधिकार लोका नाही येरां || (तु.गा.)

तुकाराम वेद्प्रामाण्य मानत होते.आपणास बौद्धिक पात्रता असतानाही वेदाधिकार नाही याचे शैल्य त्यांना बोचत होते. व ज्यांची पात्रता नाही अशांना वेदाध्ययनाचा अधिकार होता. परंतु वेदाध्ययातील रहस्य त्यांना कळत नाही. पंडितांच्या पाठांतरात चिंतन नाही,अनुभव नाही असे तुकारामांना वाटत होते. त्यामुळे भक्ती मार्ग, संत मार्गानेच आपण वेदांचे खरे मर्म समजवून घेऊ शकतो, परमेश्वरच संतांचा खरा मार्गदर्शक आहे असे तुकाराम सांगतात.

शास्त्रांचे जे सारं वेदांची जो मूर्ति | तो माझा सांगाती प्राण सखा || (तु.गा.)

तुका तरी सहज बोले वाणी | त्याचे घरी वेदांत वाहे पाणी || (तु.गा.)

आम्ही जरी शूद्र असलो तरी आम्ही वेदातील तत्त्वज्ञान आत्मसात केले असे सांगण्यासही ते मागेपुढे पाहत नाही.

**सामाजिक विषमतेचे शल्य :**

तुकाराम महाराज सुसंस्कृत होते. स्वाभिमानी होते. परंतु आपण शूद्र असल्यामुळे आपल्याला नेहमी कमी लेखले जाते समाजातल्या या विषमतेचे शल्य नेहमीच त्यांना सलत होते. ते त्यांच्या अभंगातून प्रकट झालेले दिसते.

समर्थांसी नाही वर्णा वर्णभेद \ सामग्री ते सर्व सिद्ध घरी ||
न म्हणे सोयरा सुऱ्हदय आवश्यक | राजा आणि रंग सारखाचि || (तु.गा.)

सामाजिक जीवनात कितीही विषमता असली तरी भक्ती मार्गात भेदभाव नाही परमेश्वराकडे सर्वजण समान आहेत असे तुकाराम सांगतात.

तुकारामांच्या अभंगांबद्दल सर्वसामान्यांच्या मनात जिव्हाळा आहे. वैयक्तिक जीवनात तुकारामांना मानहानी आणि निंदा सहन करावी लागली तर दुसरीकडे आपल्या अंतर्मनांत सर्व ज्ञान प्राप्त झालेले आहे असे त्यांना वाटते. अशा द्विधा अवस्थेत आपल्याला ईश्वरापर्यंत पोहोचता येत नाही ही व्यथा ते आपल्या अभंगातून व्यक्त करताना दिसतात.

अनेकांची चाले सत्ता आम्हावरी ||
तुमची ती थोरी काय मग ||
तुका म्हणे आलो दुरोनी जवळी ||
आता टाळाटाळी करू नये || ( तु.गा.)

विठ्ठल भेट न होण्याची असमर्थता त्यांच्या अभंगात दिसते. त्यामुळे ते व्यथित होतात.संताप व्यक्त करतात. हीच व्यथा,संताप त्यांच्या अभंगातून करुणपणे प्रकट होते.म्हणून संसारातील क्षणभंगुरता त्यांच्या अभंगातून समोर येते. ते म्हणतात -

सुख पाहता जवा एवढे | दुःख पर्वता एवढे ||
देह हे देवाचे धन कुबेराचे | तेथे मनुष्याचे काय आहे ||
संसारी विटेंना भ्रांतीही फिटेना | तववरी भेटेना देव तया ||
धन मिळवून कोटी | सवे न येरे लंगोटी || ( तु.गा.)

संसार त्याग केल्याशिवाय भक्ती घडणार नाही असे तुकोबा सांगतात. याचा अनुभव त्यांनी स्वतःच्या जीवनातून घेतला आहे. संसाराचा मोह सोडून दिन दयाळूंचा पाठीराखा असणाऱ्या पांडुरंगाला आपण शरण जावे असे त्यांना वाटते.

पंढरीशी जारे आल्यानो संसारा ||
दीनाचा सोयरा पांडुरंग ||
माझीया माहेर जाईन मी आता ||
निरोप या संता हाती आला || ( तु.गा.)

पंढरपूर म्हणजेच आपले माहेर आहे. अशा या पंढरपूरला तुकोबा महाराज माहेराची उपमा देताना दिसतात.

दया तिचे नाव भुताचे पालन |
आणि निर्दालन कंटकांचे |
पाया झाल्या नारू |
तेथे ना बांधावा कापुरू |
तेथे बिबव्याचे काम |
अधमाशी जे अधम |
देवावरी विंचू आला | देवपूजां नआवडे त्याला |
तेथे पैजारेचे काम | अधमाशी तो अधम || ( तु.गा.)

वरील अभंगातून कठोर असा उपदेश करताना त्यांच्या ग्रामीण बोलीतील बिभत्सता,अश्लीलता येते. परंतु त्यांची त्यांनी कधीच चिंता केली नाही कारण जिथे आवश्यक आहे तिथेच अशा शब्दांचा वापर त्यांनी केलेला दिसून येतो.

अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड | काय त्याची रांड प्रसवली ||
तुका म्हणे सांडा देखीचे दिमाख | मोडशीचे दुःख गांड फाडी ||
तुका म्हणे रांडलेका | अंति जाशील यमलोका ||
वांझे न होतील लेकुरे | काय कीजे त्या भ्रतारे ||
नपुसका पुरुषाशी | काय करील बाईल त्याशी ||
गाढव शृंगारिले कोडे | काही केल्या नवे घोडे || (तु.गा.)

अशा कितीतरी उदाहरणातून त्यांच्या भाषेचे अस्सल मराठी पण साकार होते

तुकोबांची भाषा साधी, सहजगम्य व सुटसुटीत आहे. फारशीचा,संस्कृतचा परिणाम किंवा प्रभाव त्यांच्या भाषेवर दिसत नाही. शेती व्यापार व्यवहार यातील उपमा दृष्टांत वापरून तुकारामांनी त्यांची भाषा समाजाभिमुख व लोकाभिमुख केली आहे.

आलिया भोगासी असावे सादर | देवावरी भार ठेवूनीया ||
निश्चयाचे ऐसे बळ | तुका म्हणे तेचि फळ ||
असाध्य ते साध्य करिता सायास | कारण अभ्यास तुका म्हणे ||
नाही निर्मळ जीवन |काय करील साबण ||
शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी ||
मोले घातले रडाया नाही अश्रू नाही माया ||
जगाच्या कल्याणा संताच्या विभूती | देह कष्टविती परोपकारे || ( तु.गा.)

अशी कितीतरी सुभाषिते तुकारामांच्या अभंगानी जनसामान्यांना दिली आहे. जे आहे ते वास्तव आहे त्यामुळेच तुकारामांची भाषा प्रखर आहे.

तुकाराम महाराज खरे संत होते त्यांच्या उपदेश पर अभंगातून कारुण्याबरोबरच भाषेचा जहालपणा व भाषेचा तीखटपणा पहावयास मिळतो.

नको नको मना गुंतू मायाजळी | काळ आला जवळी ग्रासावया |
सोडवेना बंधू पाठची बहीण | शेजेची कामीन दूर राहे |
सोयरे धायरे संपत्तीचे लोक | निर्वाणीचा एक पांडुरंग |
तुका म्हणे तुला सोडविना कोणी | एक चक्रपाणि वाचूनिया |
( तु.गा.)

तुकारामांच्या अभंगात नैतिकता ही ओतप्रोत भरलेली दिसून येते.लोक व्यवहाराचे बारीक निरीक्षण व मनुष्य स्वभावाचे अतिशय सूक्ष्मज्ञान तुकारामना होते. म्हणून बहिणाबाईंनी “तुका झालासे कळस” हे काढलेले उद्गार सार्थ वाटतात.

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने | शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ||
तुका म्हणे झरा | आहे मूळचाची खरा ||
अंतरीचा रंग उमटे बाहेर | मज विश्वंभर बोलवितो ||
(तु.गा.)

असे म्हणणारे तुकाराम जातिवंत साहित्यिक वाटतात.

बुडती हे जन देखवेना डोळा || (तु.गा.)

संत तुकाराम हे फक्त बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारकही होते. हे त्यांच्या वरील उद्गारावरून लक्षात येते. तुकाराम हे वैश्य व शूद्रांचे प्रतिनिधी असल्यामुळे त्यांच्या अभंगातून त्यांनी वैश्य व शूद्रांच्या प्रगतीत अडथळा आणणाऱ्या प्रवृत्तीवर जोरदार हल्ला चढविला. शास्त्री पंडितांची मिरासदारी,कर्मठांचे ढोंग , महानुभाव व नाथ पंथाच्या आचारातील फोलपणा त्यांनी उघडकीस आणला. संत तुकाराम हे कर्ते सुधारक होते,साहित्यिक होते त्याबरोबरच ते खरे भक्त होते. ईश्वरांच्या भेटीसाठी त्यांचा जीव आतुर झाला आहे.

कन्या सासुरासी जाये | मागे परतोनी पाहे |
तैसे झाले माझ्या जीवा | केव्हा भेटशी केशवा |
चुकलीया माये | बाळ हुरूहुरू पाहे |
तैसा तुका तळमळी | जीवना वेगळी मासोळी |
बहुत सुकृताची जोडी | म्हणून विठ्ठला आवडी | (तु.गा.)
पवित्र ते कुळ पावन तो देश | जेथे हरिचे दास जन्म घेती ||
(तु.गा.)

अशा प्रकारच्या अनेक अभंगातून तुकोबांची विठ्ठला प्रति असलेली ओढ दाटून येते याचबरोबर त्यांनी विठ्ठलाला चोरोटा, शिंदोळ भारवाही निलाजरा अशा शिव्याही दिलेल्या आहेत परंतु याही त्यांनी विठ्ठलाच्या प्रती असलेल्या प्रेमापोटी दिल्या आहेत.

अशाप्रकारे तुकारामांनी आपल्या अभंगातून समाज कंटकांची यथोचित संभावना करून चिरंतन नीतीमूल्यांची जोपासना केली आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

1. संपा.देवडीकर दिलीप महाराज,केंद्रे गोविंद महाराज - सुलभ तुकाराम गाथा
2. भगत रा.तु. - संत साहित्य आणि समाजप्रबोधन
3. दास वृंदावन - संत तुकाराम
4. सुंठणकर बा.रं. - महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य
5. सरदार गं.बा.- संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती
6. गीता प्रेस गोरखपुर - जगद्गुरु श्री तुकाराम महाराज
7. घोलप शोभा संत तुकारामांचा शिष्य परिवार
8. शेळके मोहन- प्राचीन मराठी वांग्मयाचा इतिहास